तुमच्यापैकी कुणीही तिनपेक्षा कमी दगडाने स्वच्छता करु नये

सलमान फारसी अल्लाह प्रसन्न असो त्यांच्यावर वर्णन करतात की: अनेकेश्वरवाद्यांनी एकदा थट्टा करत म्हटले की:आम्ही बघतो तुमचे पैगंबर तुम्हाला प्रत्येक गोष्ट शीकवितात, इथपर्यंत शौच करण्याची पद्धत सुद्धा शिकवतात, सलमान फारसी नी उत्तर दिले की,होय, त्यांनी आम्हाला शौच बद्दल माहिती दिली, आम्हाला मना करण्यात आले आहे की
कुणीही स्वच्छते करता उजव्या हाताचा उपयोग करु नये, तसेच काबा कडे तोंड किंवा पाठ
करून लघवी किंवा शौच‌ करु नये, तसेच शेण [सुकलेल्या गौऱ्या] किंवा हाडाने लघवी नंतर कोरडी स्वच्छता करण्यास मनाई आहे, आणी हे सुद्धा फरमाविले आहे की:<>.
[صحيح] [رواه مسلم]

सलमान फारसी अल्लाह प्रसन्न असो त्यांच्यावर वर्णन करतात की:अनेकेश्वरवाद्यांनी थट्टा ऊडवितांना म्हटले की: तुमचा पैगंबर तुम्हाला प्रत्येक गोष्ट शीकवितो, ईथपर्यंत शौच चे संपुर्ण शिष्टाचार सुद्धा! सलमान फारसी अल्लाह प्रसन्न असो त्यांच्यावर म्हणतात की:होय, प्रेषितांनी सलामती असो त्यांच्यावर आम्हाला शौच व तत्संबंधी संपूर्ण तपशील शिकविले; उदाहरणार्थ: उजव्या हाताने स्वच्छता करु नये,कारण तो हात पवित्र व उच्चतम राहावा, लघवी व शौच करतांना काबा कडे तोंड करु नये, हड्डी व शेणा द्वारे स्वच्छता करु नये, कारण ते बरोबर नाही,व शुद्ध पण करत नाही, आणी हे सुद्धा शिकविले तिनपेक्षा कमी दगडाने स्वच्छता करु नये,कारण कमी दगडाने स्वच्छता पुर्णच होत नाही.

http://www.sunnah.global/hadeeth/mr/show/10048